बुधवार, दि ३० एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ३२ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

## मुंबईत होणारी 'वेव्हज' परिषद मनोरंजन क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी 'दावोस' ठरणार: उपमुख्यमंत्री शिंदे

**मुंबई । प्रतिनिधी -** मुंबई बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे १ ते ४ मे दरम्यान 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चा (वेव्हज) कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या समिटच्या तयारीची पाहणी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.


वेव्हज २०२५ परिषद मुंबईत होतेय हे महाराष्ट्रासाठी गौरवास्पद आहे. जागतिकस्तरावर मनोरंजन क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी ही परिषद 'दावोस' ठरणार असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दुपारी तीनच्या सुमारास उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी जिओ वर्ल्ड सेंटरला भेट दिली. यावेळी मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नविन सोना, उद्योग विभागाचे प्रधान सचिव श्री.अनबलगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारसु आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी परिषदेबाबत सादरीकरण **पान २ वर**



## डॉ. पुरुषोत्तम वायाळ, बालाजी ढोबळे यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर





**परतूर । प्रतिनिधी -** छत्रपती संभाजीनगर येथील समर्थ सेवा समुहाच्या वतीने तालुक्यातील वाटूर येथील प्रा. डॉ. पुरुषोत्तम वायाळ व परतूर येथील पत्रकार बालाजी ढोबळे यांना ' मराठवाडा भूषण समर्थ गौरव ' हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. जलतारा हा महत्वाकांक्षी प्रकल्प प्रभावीपणे राबवून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक समृद्धी आणण्याचा कसोशीने प्रयत्न करत असल्याबद्दल प्रा. डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांना तर बालाजी ढोबळे यांना वर्तमानपत्राच्या माध्यमातून सातत्याने प्रेरणादायी व लोकोपयोगी तसेच सकारात्मक वृत्तलेखनाचा पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. येत्या १ मे रोजी महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिनाचे औचित्य साधून छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित एका कार्यक्रमात या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.

दरवर्षी आमच्या संस्थेच्या वतीने उत्कृष्ट व समाजोपयोगी कामे करणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यंदाही महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिनाचे औचित्य साधून या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे असल्याचे समर्थ सेवा समुहचे अध्यक्ष दत्ता ठुबे यांनी सांगितले आहे.

### युवा आदर्श
### तयारी ...

अवनी वरती जन्नत
खरी कश्मीर शायरी
निखळ निर्मळ सुख
आनंदोत्सवी पायरी
जन्नतवरती मालकी
इच्छा अंतरी भुयारी
जहन्नुममध्ये जायची
पाकडे करती तयारी
दुर्दैव खरोखर आपले
कुचाळखोरी शेजारी
सतत दुस्वास करती
बुध्दी भ्रष्टले आजारी
आतंक खोरां आसरा
सामान्य जना बेजारी
असह्य आता सबुरी
फार सोसली मुजोरी
सर्जिकल स्ट्रॉईक करे
तरीही कशी शिरजोरी
नकली नबाबी रूबाब
रिकामी जरी तिजोरी
बने कफल्लक दरिद्री
खर्च वाढतोयं लष्करी
युध्द साहित्य भरमारी
खायला नसू दे भाकरी

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

## नगरपंचायतीच्या पाठपुराव्यासाठी ग्रामस्थांचे निवेदन

### विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्याची मागणी

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** सतरा सदस्य संख्या असलेल्या टेंभुर्णी तालुका जाफराबाद ग्राम पंचायतला नगरपंचायतीचा दर्जा देण्यासाठी विशेष ग्रामसभेचे आयोजन करावे अशी मागणी ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे केली आहे.

सोमवारी (ता.२८) ग्रामपंचायत अधिकारी जगदीश आढाव यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, टेंभुर्णी गावाची वाढती लोकसंख्या व व्याप्ती पाहता ग्राम संसद कार्यालयास येणारा वित्त आयोगाचा निधी अपुरा पडत आहे. यामुळे मूलभूत सोयीसुविधांपासून नागरिक वंचित आहेत. पाणी वीज रस्ते व नाल्यांची व्यवस्था नसल्याने ग्रामस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते दरम्यान या संदर्भात मागील काळात ग्रामपंचायतच्या मासिक बैठकीत टेंभुर्णी ग्रामपंचायतला नगरपंचायतीचा दर्जा देण्यासंदर्भात ठराव घेण्यात आला परंतु सदर ठराव वरिष्ठ पातळीवर ग्राम संसद कार्यालयाकडून पोहोचविला जात




नसल्याने ही कार्यवाही त्वरित करून विशेष ग्रामसभेचे आयोजन करावे अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे . माजी सरपंच विष्णू जमधडे, लक्ष्मण शिंदे,जनार्दन झोरे ,किशोर कांबळे ,फैसल चाऊस, रावसाहेब अंभोरे,युसुफ शेख, सर्जेराव कुमकर, भिकन पठाण पांडुरंग बोरसे, संजय राऊत, विशाल शिंदे, राजू देशमुख, बाळू देशमुख, गणेश गाडेकर, विष्णू जोशी, वामनराव सोनवणे, शारेक सिद्दिकी , संजय डोईफोडे, शिवाजी तांबेकर, संजय घोडके, तुळशीराम पोटे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थांची उपस्थिती होती.

सद्यस्थितीत टेंभुर्णी ग्रामपंचायत मध्ये विकास कामांसाठी निधी उपलब्ध नाही मी सदस्य असतानाही वार्डातील अपेक्षित कामे निधी अभावी करू शकत नाही यामुळे ग्रामस्थांचाही रोष पत्करावा लागतो यामुळे गावाला मुबलक निधी उपलब्ध होऊन मूलभूत सोयी सुविधा देण्यासाठी ग्रामपंचायतला नगरपंचायतीचा दर्जा मिळणे गरजेचे आहे त्या अनुषंगाने ग्रामस्थांच्या भावना लक्षात घेऊन आम्ही यासंदर्भात निवेदन दिले असल्याचे माजी सरपंच विष्णू जमधडे यांनी यावेळी म्हटले आहे.

गावाच्या विकासासाठी निधीची आवश्यकता असते परंतु विकासासाठी वित्त आयोगाच्या माध्यमातून येणारा निधी तुटपुंज असतो यामुळे गावाची वाढलेली व्याप्ती व अपुरा पडणारा निधी पाहता गावाला ग्राम संसद कार्यालया ऐवजी नगरपंचायतीचा दर्जा मिळणे गरजेचे आहे जेणेकरून विकास साधण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होणार असल्याची प्रतिक्रिया समाजसेवक विशाल शिंदे यांनी दिली. **पान २ वर**

## १० मे रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** उच्च न्यायालय, मुंबई व मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार दिनांक १० मे, २०२५ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय, जालना येथे राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या लोक अदालतीचा जास्तीत जास्त लोकांना फायदा व्हावा या उद्देशाने लोक अदालत बाबतची माहिती व प्रसिध्दी घरा-घरा पर्यंत पोहचावी या उद्देशाने व लोकांनी जास्तीत जास्त प्रकरणे लोक न्यायालयाच्या माध्यमातून निकाली निघावे या हेतुन राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

लोक अदालतीमध्ये आपली जास्तीत जास्त प्रकरणे ठेवावी यासाठी विधिज्ञ, पक्षकार व शासनाच्या विविध विभागांनी/अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना वर्षा एम. मोहिते व सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना प्रणिता पी. भारसाकडे-वाघ यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.



**'सीएमआयए २०२५' सस्टेनबिलिटी व पर्यावरण जाणीवपूर्वक उत्पादन पुरस्कार मिळाल्याबद्दल कालिका स्टील चे संचालक उद्योजक घनश्यामदास गोयल यांचा भारतीय जनता पक्षाच्यावतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे, उद्योजक अर्जुन गेही, महानगर प्रमुख सतीश जाधव, सुनील खरे, सिद्धिविनायक मुळे, अशोक पांगारकर, गोवर्धन कोल्हे आदी.**

# संपादकीय

## सामाजिक क्रांतीचे जनक

सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर यांची आज जयंती. दरवर्षी अक्षय तृतीयेला महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी केली जाते. महात्मा बसवेश्वर यांचा जन्म ११०५ मध्ये झाला. महात्मा बसवेश्वर हे बिज्जल राज्याच्या दरबारात महामंत्री होते. महात्मा बसवेश्वर यांना सामाजिक क्रांतीचे जनक असे म्हणतात कारण त्यांनी प्रचलित सनातनी धर्मातील कर्मकांड, अंधश्रद्धा, जातीव्यवस्था, स्त्री-पुरुष, उच्चनीच, श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभाव यासारख्या कुप्रथांच्या विरोधात बंड पुकारले. हे बंड म्हणजे माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारणाऱ्या संस्कृती विरुद्ध पुकारलेला एल्गार होता. या बंडात सामाजिक क्रांतीची बीजे पेरली गेली होती. बाराव्या शतकात भारताचे समाज जीवन अंधकारमय झाले होते. समाजात अंधश्रद्धा, कर्मकांड, भेदभाव वाढत चालला होता. बहुदेवता उपासना, पुरोहित वर्गाची मक्तेदारी, पाप पुण्याची दहशत, उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्त्री- पुरुष भेदभाव इत्यादींनी भारतीय समाजमन बेजार झाले होते. अशा वेळी भारतीय समाजमन जागृत करुन माणसाला माणूसपण मिळवून देण्याचे काम महात्मा बसवेश्वर यांनी केले. त्यासाठी त्यांना तत्कालीन समाजसत्तेशी, राज सत्तेशी मोठा संघर्ष करावा लागला. माणूस हा जन्माने नव्हे तर कर्माने मोठा होतो अशी त्यांची धारणा होती म्हणूनच तत्कालीन व्यवस्था बदलून नवी समाजव्यवस्था त्यांचे निर्माण केली. जिथे उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्त्री-पुरुष, जात-पात असा कुठलाही भेदभाव नाही, विषमता नाही. कर्मकांड, अंधश्रद्धा नाही अशी समाजव्यवस्था महात्मा बसवेश्वर यांनी आपल्या अलौकिक विचारधारेतून आणून दाखवली म्हणूनच त्यांना दक्षिणेतील गौतम बुद्ध असे म्हणतात. प्रत्येकाने कर्म करूनच जगले पाहिजे. जन्माच्या आधारे भेदभाव नाही. या त्यांच्या या विचारांची अंमलबजावणी पुढे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात केली. जगातील पहिली संसद असे ज्याचे वर्णन केले जाते ती अनुभव मंटप नावाची परंपरा त्यांनी सुरू केली. अनुभव मंटप हे असे सार्वजनिक ठिकाण होते जिथे सर्व समाज घटकांतील स्त्री पुरुष एकत्र बसून आपआपले अनुभव सांगत आणि त्यातून समाज म्हणून एकत्रितपणे पुढे जाण्याचे नियम ठरत. महात्मा बसवेश्वरांचे एक वचन आहे. कायकवे कैलास कैलास म्हणजे मोक्ष, म्हणजे काम केल्यानेच मोक्ष मिळतो. मोक्ष मिळवण्यासाठी कुठल्याही कर्मकांडाची गरज नाही. महात्मा बसवेश्वरांनी आपल्या सहकार्याच्या मुलगा आणि मुलीच्या विवाहास समर्थन दिले जो आंतरजातीय विवाह होता. मुलगा हा चांभार समाजाचा तर मुलगी ब्राह्मण समाजाची होती. महात्मा बसवेश्वरांच्या या सुधारणावादी, समतावादी कार्याने खवळलेल्या सनातन्यांनी या घटनेचे भांडवल करून लोकांना भडकवले आणि दुसऱ्या बाजुला राजा बिज्जलचा खून करुन त्याचा आळ महात्मा बसवेश्वरांवर आणला. सहकाऱ्यांच्या आग्रहास्तव महात्मा बसवेश्वर जीव वाचवण्यासाठी तेथून पळाले पण सनातन्यांनी अनेक शरण, शरणार्थ्यांची हत्या केली. त्यांनतर महात्मा बसवेश्वरांनी पुन्हा समतावादी लिंगायत धर्माची परंपरा वाढवण्याचा प्रयत्न केला. महात्मा बसवेश्वर यांचे समतावादी, सुधारणावादी विचार आपल्या जीवनात आचरणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. जयंतीदिनी महात्मा बसवेश्वर यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## एम. आर. डी. ए. स्कूलमध्ये कायदेविषयक शिबिर संपन्न

**जालना -** उच्च न्यायालय मुंबई व मुंबई महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना व एम.आर.डी.ए. स्कुल, जालना यांच्या संयुक्त विद्यमान दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजी एम.आर.डी.ए. स्कुल, जालना येथे कायदेविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले. त्याप्रसंगी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा एम. मोहिते, प्रणिता पी. भारसाकडे-वाघ, प्रमुख न्यादंडाधिकारी जुवेनाईल जस्टीस बोर्ड (जे.जे.बी.), आर.एन. मुजावर, ॲड. अश्विनी एम. धन्नावत, व एम.आर.डी. स्कुलच्या संचालीका ईश्वरी चव्हाण उपस्थित होत्या.

# सुख, समृद्धी आनंद देणारी... अक्षय तृतीया

वैशाख शु.तृतिया म्हणजेच अक्षय तृतिया. जी साडेतीन शुभ मुहूर्त आपण मानतो,त्यातच अक्षय तृतिया हे एक पुर्ण मुहूर्त आहे. हिंदू धर्मातील पवित्र आणि महत्त्वाचा सण मानला जातो.

अक्षय तृतीया तिथी २९ एप्रिल २०२५ रोजी संध्याकाळी पाच वाजून ३१ मिनिटांनी सुरू होत असून ३० एप्रिल २०२५ ला दुपारी दोन वाजून तेरा मिनिटांनी समाप्ती आहे. अक्षय तृतीया ३० एप्रिल रोजी साजरी केली जाईल.

अक्षय म्हणजेच क्षय न होणारे, नाश न पावणारे. या दिवशी अन्नपूर्णा देवी जयंती, बसवेश्वर जयंती, नरनारायण या देवतेची जयंती, परशुराम जयंती, असते. या दिवशी महर्षी व्यासांनी महाभारत ग्रंथाची रचना करायला प्रारंभ केला आणि त्यांचे लेखनिक म्हणून श्रीगणेशाने काम केले अशी आख्यायिका आहे.

ह्या दिवशी दानाचेही अत्यंत महत्व आहे. अक्षय तृतियेच्या दिवशी केलेल्या दानाचेही अधिक पटीने पुण्य मिळत असते,ते चिरकाल टिकणारे असते म्हणून अनेक जण अक्षय तृतीयेस छत्री,पायातल्या वहाणा,पाण्यासाठी मठ,रांजण,पंचे,कापड,वस्त्र,आदींचे गरजू व्यक्तींना, वृध्दाश्रमात, गोरगरिबांचे वस्त्यात जाऊन दान करत असतात. जवस, गहू, हरभरा, दुग्धजन्य पदार्थ, जलकुंभ, सर्व प्रकारचे रस, आणि उन्हाळ्यात उपयुक्त अशा वस्तूचे दान करत असतात.यामुळे अनंत फलप्राप्ती होत असते. या तिथीला केलेले दान, हवन आणि पितरांना उद्देशून जे कर्म केले जाते ते सर्व अक्षय म्हणजे अविनाशी आहे.

ज्याला ज्या प्रमाणात शक्य असेल तेवढे त्यांनी जरूर करावे.सतपात्री दान करावे अशी भावना आहे.

या दिवशी भगवान विष्णू आणि लक्ष्मीची पूजा करतात.विधिवत पूजा केल्यास आपले मनोरथ पूर्ण होतात.

ह्या सुमारास उन्हाच प्रमाण वाढले असते, तापमान खूप असते.म्हणून अनेक व्यापारी मंडळी,संस्था, काही व्यक्ती रस्तारस्यावर पाणपोई सुरु करतात. जनावरांच्या पाण्यासाठी हौद,हाळ,बांधतात. ज्या ज्या पासून पुण्यप्राप्ती होईल ते.ते करतात. कारण ते अक्षय आहे.अक्षय तृतियेला पितरांचे स्मरण करुन श्राध्द घालण्याचीही प्रथा आहे.या सणाचे निमित्ताने मनात पितरांची स्मृती जागृत होते.त्यांचे आशिर्वाद घराला मिळतात. या दिवशी पवित्र नद्यांच्या संगमावर किंवा गंगा स्नानाचे महत्त्व आहे गंगास्नानने ती व्यक्ती पवित्र होते पापमुक्त होते असा समज आहे.

अक्षय तृतिया हे नाव पडण्यामागचे कारणमदनरत्न ह्या ग्रंथात श्रीकृष्णाने युधिष्ठनाला सांगितले आहे. श्रीकृष्ण म्हणतात,

हे युधिष्ठिरा,या तिथीला केलेले दान,हवन,क्षयाला जात नाही.

हा मुहूर्ताचाच दिवस असल्याने, सोने,चांदी,दागिने. मौल्यवान वस्तुंची खरेदी.अनेक शुभ कामांना प्रारंभ केला जातो. नवीन जागा व्यवसाय चे उद्घाटन, नवीन वाहन खरेदी, नवीन संकल्प या दिवशी केले जातात. कोणतेही शुभ कार्य या दिवशी सुरू केल्यास ते कायमस्वरूपी टिकून राहते.

या दिवशी कृषिसंस्कृतीचा पालक म्हणून बलराम ाची ही पूजा होते. शेतकरी शेतीच्या कामाला सुरूवात करतात.शेतकरी शेती कामासाठी नविन सालदाराची नेमणूक करत असत.आज ही प्रथा काहीच ग्रामीण भागात आढळून येते.काळा नुसार प्रथा बदलतात.

सध्या सर्वत्र पाण्याचे दुर्भिक्ष असल्याने अशा परिस्थितीत ज्यांना ज्यांना शक्य आहे त्यांनी पाणपोई काढून पुण्य पदरी पाडावे,अशी स्थिती आहे.

ह्या काळात नामस्मरणालाही तेवढेच महत्व आहे.आपल्याला प्रिय असलेल्या देवतेचे होईल तेवढे नामस्मरण करावे.विष्णुसहस्त्रनाम,लक्ष्मीची उपासना,करावी..ह्या दिवशी केलेल्या नामस्मरणाने घरातील दोष नाहीसे होतात.

आपल्याला आवडत्या देवतेचे नमस्मारण किंवा मंत्र पठण याने पुण्य अखंड टिकून राहते .

।। ओम नमो भगवते वासुदेवाय ।।

किंवा

।। सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते ।।

हा जप आपण करू शकतो.

स्त्रियांनी घरात चैत्र गौरीची स्थापना केली असते.ह्या शेवटच्या दिवशी स्त्रिया हळदीकुंकवाचा कार्यक्रम करतात. गौरीला सांजोरी,करंजी,शेवेचा,नैवेद्यही दाखवतात.त्या निमित्ताने महिला एकत्र येतात. आंब्याची डाळ, कैरीचे पन्हे, देतात.मोगऱ्याच्या फुलांचे गजरे देतात.

खान्देशात अक्षय तृतीया सण फार उतत्साहात साजरा होतो.खान्देश भागात आखाजी म्हणून हा सण ओळखला जातो. ग्रामीण भागात पत्याचे डाव रंगतात. जुगार खेळायला परवानगी असते जणू. तरुण,वयस्कर,सर्वच ह्यात सहभागी होतात.गल्लीत, देवळाच्या ओट्यावर, गोठयात, पारावर, जागोजागी डाव रंगलले दिसतात.

मुली माहेरवाशीण म्हणून आलेल्या असतात. त्यांच्या साठी पुरणपोळी,आंब्याचा रस, कटाची आमटी,काही ठिकाणी मांडे( म्हणजे खापरावर केलेल्या मोठ्या पुरण पोळ्या)हा बेत हमखास असतो.

अक्षय तृतिया दिवशी मुली माहेरी असतात. खानदेशात अनेक खेड्यामध्ये झाडाला झोके बांधलेले असतात आणि महिला एकत्र जमवून आखाजीची गाणी म्हणत असतात.बालपणीच्या मैत्रीणींना भेटून आनंदाची उधळण करत असतात. तिथे वयाचा विचार नसतो.

अक्षय तृतियेला भगवान परशुरामची जयंती असते. भगवान विष्णूचा हा सहावा अवतार, ,आणि अष्टचिरंजीवा पैकी एक चिरंजीव अशी त्यांची महती आहे.त्यांचे पूजन केले जाते.अनेक ठिकाणी परशुरामाची मिरवणूक काढण्यात येते. आपल्या महाराष्ट्रात चिपळूण जवळ भगवान परशुरामाचे मंदिर आहे.

एके वर्षी आम्ही आमच्या सद्गुरु माऊली समवेत सात- आठ दिवस ऋषिकेशला होतो त्यावेळी अक्षयतृतीयेला गंगा स्नान आणि स्वामी शिवानंद स्वामींचे आश्रमात महाप्रसाद घेतला होता. त्या अक्षय तृतीयेचा आनंद अवर्णनीय आहे...

या दिवशी--

अक्षय तृतीया दिवशी पवित्र नदीमध्ये तसेच गंगा स्नानाचे महत्त्व आहे.

ब्राह्मणाला भोजन देऊन वस्त्रदान तांदूळ, मीठ, फळे,छत्री, वाहाणा, दान करण्याचे महत्त्व आहे.

साडेतीन मुहूर्ता पैकी एक असल्याने या दिवशी सोने चांदी खरेदी नवे वस्त्र खरेदीचे महत्व आहे. वाहन खरेदी करतात.

पाण्याने भरलेली घागर वाळा टाकून ब्राह्मणास दान देतात तसेच या दिवसापासून अनेक लोक पानपोळी सुरू करतात.

शुभकार्य, संकल्पांची सुरुवात करतात.

भगवान परशुराम हे सप्तर्षीपैकी एक, तसेच जमदग्नीऋषी आणि रेणुका मातेची पुत्र. अक्षय तृतीयेच्या दिवशी भगवान परशुराम यांची जयंती हिंदू मोठ्या थाटामाटा सादर करतात.

या दिवशी पवित्र गंगा नदी स्नान केल्याने पापे नष्ट होतात अशी धरणा आहे.

अक्षय तृतीयेच्या दिवशी अन्नपूर्णा माता यांचा जयंती दिवस देखील मानला जातो. अन्नपूर्णा मातेची पूजा केली जाते. अन्नपूर्णा मातेचे पूजनाने स्वयंपाक घरात जेवणाची चव वाढते आणि घरात अन्नाची बरकत असते.कधीही कमी पडत नाही.

अनेक दृष्टीने अक्षय तृतियेचे महत्व आहे. सुख.समृद्धी. आनंद.देणारा सण आहे.

काळाच्या ओघात अनेक प्रथा परंपरा कमी होत असल्याचे जाणवते.

असे सणवार आपल्या संस्कृतीचा ठेवा आहे. त्याची जपणूक करणे आपले काम आहे. महाराष्ट्रा सह दक्षिण भारत, पश्चिम बंगाल, राजस्थान, या ठिकाणी अक्षय तृतीया सण साजरा केला जातो. ह्या अक्षय तृतीयेच्या दिवशी आपण सर्व जण एक संकल्प करु . देवासमोर एक धान्याचा आणि दुसरा पाण्याने भरलेला असे कलश ठेवन सुख,समृद्धी साठी अक्षय वरदान मागू या.

ह्या वर्षी अक्षय तृतिया ३० एप्रिल रोजी आहे. आपण सगळे सुख,समृध्दि, आरोग्य,या साठी, भगवान विष्णू,अन्नपूर्णा माता आणी लक्ष्मीदेवी कडे प्रार्थना करु या.

।। सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते ।।
।। अन्नपूर्णे सदा पूर्णे शंङ्कर प्राणवल्लभे
ज्ञानवैराग्य सिध्दर्थं भिक्षां देही च पार्वती ।।

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव.**
**मो.नं.८९९९५६६९१७**
dilipdeshpande24gmail.com

## पान १ वरुन

### मुंबईत होणारी ...

करण्यात आले. या कार्यक्रमाचे यजमानपद महाराष्ट्र शासनाला मिळाले ही अभिमानाची बाब असून असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे आयोजन होत आहे असे सांगत उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दुरदृष्टीतून ही परिषद साकार होत आहे. विशेष म्हणजे प्रधानमंत्री श्री. मोदी १ मे रोजी संपूर्ण दिवसभर मुंबईत उपस्थित राहणार आहेत. भारत जगात आघाडीवर आहे हे सिद्ध करण्यासाठी ही परिषद महत्वाची असून मुंबई हे देशाचे ग्रोथ इंजिन आहे तसेच मिडिया आणि मनोरंजनाचे हे केंद्र असल्याने या परिषदेमुळे मनोरंजन क्षेत्राला तांत्रिकदृष्ट्या नवी ओळख मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. या परिषदेमुळे आंतरराष्ट्रीय स्टुडिओज, प्रोडक्शन हाऊसेस, टेक कंपन्यांची भागीदारीची याची दारे खुली होतील असेही ते म्हणाले.

### नगर पंचायतीच्या ...

वारंवार मागणी करूनही ग्राम संसद कार्यालयाकडून प्रस्ताव पाठवण्यात विलंब होत आहे या संदर्भात आपण मासिक बैठकीत ठराव लिहिला असून त्या अनुषंगाने ग्रामस्थांच्या जनभावना लक्षात घेता आमदार संतोष दानवे यांनी पुढाकार घेऊन टेंभुर्णी गावाला नगरपंचायतीच्या दर्जा मिळवून द्यावा.तसेच पंचायतीने वरिष्ठ कार्यालयात नगरपंचायतीचा प्रस्ताव पाठवावा गावाच्या वाढत्या व्याप्तीमुळे निधीची कमतरता पडत असल्याचे माळी महासंघाचे तालुकाध्यक्ष संजय राऊत यांनी म्हटले आहे. यापूर्वी देखील विविध संघटना, नेते, कार्यकर्ते यांनी नगरपंचायत करण्यासंदर्भात लेखी निवेदने दिली मात्र भाजपच्या एका वजनदार नेत्याच्या दबावामुळे ग्रामपंचायत सदरचा ठराव देण्यास टाळाटाळ करत असल्याचे एका कार्यकर्त्याने खाजगीत सांगितले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

युवा आदर्श | जालना | बुधवार, दि ३० एप्रिल २०२५ | E-mail- yuva.aadarsh@gmail.com


# अक्षय (अक्षय्य) तृतीया; साडेतीन मुहूर्तापैकी एक

साडेतीन मुहुर्तांपैकी एक पूर्ण मुहूर्त असलेल्या अक्षय (अक्षय्य) तृतीयेला तिलतर्पण करणे, उदकुंभदान (उदककुंभदान) करणे, मृत्तिका पूजन करणे, तसेच दान देण्याचा प्रघात आहे. अक्षय्य तृतीयेमागील अध्यात्मशास्त्र सनातन संस्थेद्वारा संकलित या लेखात आपण समजून घेऊया.

अक्षय्य तृतीया हा कृतयुगाचा किंवा त्रेतायुगाचा प्रारंभदिन आहे.

या तिथीला हयग्रीव अवतार, नरनारायण प्रकटीकरण आणि परशुराम अवतार झाला.

या तिथीला ब्रह्मा आणि श्रीविष्णु यांच्या मिश्र लहरी उच्च देवतांच्या लोकांतून पृथ्वीवर येतात. त्यामुळे पृथ्वीवरील सात्त्विकता १० टक्क्यांनी वाढते.

या कालमाहात्म्यामुळे या तिथीस पवित्र स्नान, दान यांसारखी धर्मकृत्ये केल्यास त्यांच्यामुळे आध्यात्मिक लाभ होतो.

या तिथीस देव आणि पितर यांना उद्देशून जे कर्म केले जाते, ते सर्व अक्षय (अविनाशी) होते.

महत्त्वः

अस्यां तिथौ क्षयमुपैति हुतं न दत्तं
तेनाक्षयेति कथिता मुनिभिस्तृतीया ।
उद्दिश्य दैवतपितन्क्रियते मनुष्यैः
तच्चाक्षयं भवति भारत सर्वमेव ।। - मदनरत्न

अर्थ : (श्रीकृष्ण म्हणतो) हे युधिष्ठिरा, या तिथीस केलेले दान आणि हवन क्षयाला जात नाही; म्हणून हिला मुनींनी 'अक्षय तृतीया' असे म्हटले आहे. देव आणि पितर यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते, ते सर्व अक्षय (अविनाशी) होते.

अक्षय तृतीया या दिवसाला ऋसाडेतीन मुहुर्तांतील एक मुहूर्त' मानले जाणे

'अक्षय (अक्षय्य) तृतीया साडेतीन मुहुर्तांपैकी एक आहे. याच दिवशी त्रेतायुगाला प्रारंभ झाला. या दिवसाने एका कलहकालाचा अंत आणि दुसर्या युगाच्या सत्ययुगाचा प्रारंभ, अशी संधी साधलेली असल्यामुळे अक्षय (अक्षय्य) तृतीया या संपूर्ण दिवसाला 'मुहूर्त' म्हणतात. मुहूर्त केवळ एका क्षणाने साधलेला असला, तरी संधीकालामुळे त्याचा परिणाम २४ घंट्यांपर्यंत कार्यरत असल्याने तो संपूर्ण दिवस शुभ मानला जातो; म्हणूनच (अक्षय्य) तृतीया या दिवसाला ऋसाडेतीन मुहुर्तांतील एक मुहूर्त' मानले जाते.

अवतार होणे

अक्षय (अक्षय्य) तृतीया या तिथीवरच हयग्रीव अवतार, नरनारायण प्रकटीकरण आणि परशुराम अवतार झाला. यावरून अक्षय तृतीया या तिथीचे महत्त्व लक्षात येते.'

धर्मकृत्यांचा अधिक लाभ होणे

'या तिथीला विष्णुपूजा, जप, होमहवन, दान आदी धर्मकृत्ये केल्यास अधिक आध्यात्मिक लाभ होतो', असे मानले जाते.

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सातत्याने सुख-समृद्धी प्राप्त करून देणार्या देवतेची कृतज्ञतेचा भाव ठेवून उपासना केल्यास आपल्यावर होणार्या त्या देवतेच्या कृपादृष्टीचा कधीही क्षय होत नाही, असे मानले जाते.

श्रीविष्णुसहित वैभवलक्ष्मीच्या प्रतिमेचे कृतज्ञतेचा भाव ठेवून भक्तीभावाने पूजन करावे. होमहवन आणि जपजाप्य करण्यात काळ व्यतीत करावा

अक्षय तृतीया हा सण साजरा करण्याची पद्धत

'कालविभागाचा कोणताही प्रारंभदिवस भारतियांना नेहमीच पवित्र वाटतो; म्हणून अशा तिथीस स्नानदानादी धर्मकृत्ये सांगितली गेली आहेत. या दिवसाचा विधी असा आहे - पवित्र जलात स्नान, श्रीविष्णूची पूजा, जप, होम, दान आणि पितृतर्पण. या दिवशी अपिंडक श्राद्धकरावे आणि ते जमत नसेल, तर निदान तिलतर्पण तरी करावे.

उदकुंभाचे (उदककुंभाचे) दान

या दिवशी देव आणि पितर यांना उद्देशून ब्राह्मणाला उदककुंभाचे दान करावे.

महत्त्व : उदककुंभालाच 'सर्वसमावेशक स्तरावरील निर्गुण पात्र' असे संबोधले जाते.

उद्देश : अ. उदककुंभाचे दान करणे, म्हणजेच स्वतःच्या सर्व प्रकारच्या देहसदृश, तसेच कर्मसदृश वासनांच्या स्थूल, तसेच सूक्ष्म लहरी कुंभातील जलाला पवित्र मानून त्यात विसर्जित करणे आणि अशा प्रकारे स्वतःचा देह आसक्तीविरहित कर्माने शुद्ध करून त्यानंतर उदककुंभायोगे या सर्व वासना पितर अन् देव यांच्या चरणी ब्राह्मणाला ग्राह्य धरून अर्पण करणे

आ. पितरांच्या चरणी उदककुंभ दान दिल्याने पितर मानवयोनीशी संबंधित असल्याने ते आपल्या स्थूल वासना नष्ट करतात.

इ. देवाचा कृपाशीर्वाद हा आपल्या प्रारब्धजन्य सूक्ष्म कर्मातील पाप नष्ट करत असल्याने सूक्ष्म कर्मजन्य वासना देवांच्या चरणी या दानाकरवी अर्पण केल्या जातात.

उदकुंभ दानाचा मंत्र : ब्राह्मणाला उदकुंभाचे दान देतांना पुढील मंत्र म्हणावा

एष धर्मघटो दत्तो ब्रह्मविष्णुशिवात्मकः । अस्य प्रदानात् तृप्यन्तु पितरोऽपि पितामहाः ।।
गन्धोदकतिलैर्मिश्रं सान्नं कुम्भं फलान्वितम् । पितृभ्यः सम्प्रदास्यामि अक्षय्यमुपतिष्ठतु ।। - धर्मसिन्धु

अर्थ : ब्रह्मा, विष्णु आणि शिव ज्यात सामावले आहेत असा हा धर्मघट मी ब्राह्मणाला दान केला आहे. या दानामुळे माझे पितर आणि देवता तृप्त होवोत. गंध, उदक, तीळ, यव आणि फळे यांनी युक्त असा हा कुंभ मी पितरांसाठी देत आहे. हा कुंभ माझ्यासाठी सदा अक्षय्य (क्षय न पावणारा) ठरो.

शास्त्र : अक्षय तृतीया या दिवशी ब्रह्मांडात अखंड रूपातील, तसेच एकसमान गतीजन्यता दर्शवणार्या सत्त्व-रज लहरींचा प्रभाव अधिक प्रमाणात असल्याने या लहरींच्या प्रवाहायोगे पितर आणि देव यांना उद्देशून ब्राह्मणाला केलेले दान पुण्यदायी आणि मागील जन्माच्या देवाणघेवाण हिशोबाला धरून कर्म-अकर्म करणारे ठरत असल्याने या कधीही क्षय न होणार्या लहरींच्या प्रभावाच्या साहाय्याने केलेले दान महत्त्वाचे ठरते.'

तिलतर्पण करणे

अर्थ आणि भावार्थ

अ. 'तिलतर्पण म्हणजे देवता आणि पूर्वज यांना तीळ अन् जल अर्पण करणे. तीळ हे सात्त्विकतेचे प्रतीक आहे, तर जल हे शुद्ध भावाचे प्रतीक आहे.

आ. देवाजवळ सर्वकाही आहे. त्यामुळे आपण त्याला काय अर्पण करणार ? तसेच 'मी देवाला काहीतरी अर्पण करतो', हा अहंही नको. यासाठी तीळ अर्पण करतांना 'देवच माझ्याकडून सर्वकाही करवून घेत आहे', असा भाव ठेवावा. यामुळे तिलतर्पण करतांना साधकाचा अहंन वाढता त्याचा भाव वाढण्यास मदत (साहाय्य) होते. तिलतर्पण करणे म्हणजे देवतेला तीळांच्या रूपाने कृतज्ञतेचा आणि शरणागतीचा भाव अर्पण करणे होय.

तिलतर्पण कोणाला करायचे ?

अ. देवता

पद्धत : प्रथम देवांचे आवाहन करावे. तांब्याचे किंवा कोणत्याही सात्त्विक धातूचे तबक किंवा ताट हातात घ्यावे. ब्रह्मा किंवा श्रीविष्णु यांचे किंवा त्यांच्या एकत्रित रूपाचे, म्हणजे दत्ताचे स्मरण करून त्यांना ताटात येण्याचे आवाहन करावे. त्यानंतर 'देवता सूक्ष्मातून तेथे आलेल्या आहेत', असा भाव ठेवावा. त्यानंतर 'त्यांच्या चरणांवर तीळ अर्पण करीत आहोत', असा भाव ठेवावा.

परिणाम : प्रथम (सूक्ष्मातून आलेल्या देवतांच्या चरणांवर) तीळ अर्पण केल्यामुळे तिळांत देवतांकडून प्रक्षेपित होणारी सात्त्विकता अधिक प्रमाणावर ग्रहण होते आणि जल अर्पण केल्यावर अर्पण करणार्याचा भाव जागृत होतो. भाव जागृत झाल्यामुळे देवतांकडून तिळांत ग्रहण झालेली सात्त्विकता तिलतर्पण करणार्याला अधिक प्रमाणावर ग्रहण करता येते.

आ. पूर्वज

महत्त्व : अक्षय तृतीयेला पूर्वज पृथ्वीजवळ आल्यामुळे मानवाला अधिक त्रास होण्याची शक्यता असते. मानवावर असलेले पूर्वजांचे ऋण फेडण्यासाठी मानवाने प्रयत्न करणे ईश्वराला अपेक्षित आहे. यासाठी अक्षय (अक्षय्य) तृतीयेला पूर्वजांना गती मिळण्यासाठी तिलतर्पण करायचे असते.

पद्धत : पूर्वजांना तीळ अर्पण करण्यापूर्वी तिळांमध्ये श्रीविष्णु आणि ब्रह्मा यांची तत्त्वे येण्यासाठी देवतांना प्रार्थना करावी. त्यानंतर 'पूर्वज सूक्ष्मातून आलेले आहेत आणि आपण त्यांच्या चरणांवर तीळ आणि जल अर्पण करत आहोत', असा भाव ठेवावा. त्यानंतर दोन मिनिटांनी देवतांच्या तत्त्वांनी भारीत झालेले तीळ आणि अक्षता पूर्वजांना अर्पण कराव्यात. सात्त्विक बनलेले तीळ हातात घेऊन त्यावरून ताटामध्ये हळुवारपणे पाणी सोडावे. त्या वेळी दत्त किंवा ब्रह्मा किंवा श्रीविष्णु यांना पूर्वजांना गती देण्यासाठी प्रार्थना करावी.

परिणाम : तिळांमध्ये सात्त्विकता ग्रहण करून रज-तम नष्ट करण्याची क्षमता अधिक आहे. साधकाच्या भावानुसार तिलतर्पण करतांना सूक्ष्मातून ताटामध्ये आलेल्या पूर्वजांच्या प्रतिकात्मक सूक्ष्म-देहावरील काळे आवरण दूर होऊन त्यांच्या सूक्ष्म-देहांतील सात्त्विकता वाढते आणि त्यांना पुढच्या लोकात जाण्यासाठी आवश्यक अशी ऊर्जा मिळते.

अक्षय तृतीयेला करावयाच्या दानाचे महत्त्व

अक्षय (अक्षय्य) तृतीयेला केलेले दान कधीही क्षयाला जात नाही. त्यामुळे या दिवशी केलेल्या दानातून पुष्कळ पुण्य मिळते. पुष्कळ पुण्य मिळाल्यामुळे जिवाने पूर्वी केलेले पाप न्यून होते आणि त्याचा पुण्यसाठा वाढतो. एखाद्या जिवाचे पूर्वीचे कर्म चांगले असल्यास त्याचा पुण्यसाठा वाढतो. यामुळे जिवाला स्वर्गप्राप्ती होऊ शकते; परंतु साधकांना पुण्य मिळवून स्वर्गप्राप्ती करायची नसते, तर त्यांना ईश्वरप्राप्ती करायची असते. यामुळे साधकांनी सत्पात्रे दान करणे आवश्यक असते. येथे सत्पात्रे दान, म्हणजे जेथे अध्यात्मप्रसारासमवेतराष्ट्र आणि धर्म यांसाठी कार्य केले जाते, अशा सत्च्या कार्यात दान करणे. सत्पात्रे दान केल्यामुळे दान करणार्याला पुण्य मिळणार नाही, तर दानाचे कर्म हे अकर्म कर्म होईल. त्यामुळे त्याची आध्यात्मिक उन्नती होईल. आध्यात्मिक उन्नती झाल्यामुळे साधक स्वर्गलोकात न जाता उच्च लोकांत जाईल.'

धनाचे दान : वर उल्लेखिल्याप्रमाणे सत्पात्रे दान संत, धार्मिक कार्य करणार्या व्यक्ती, धर्मप्रसार करणार्या आध्यात्मिक संस्था, धर्माविषयीचे उपक्रम आदींना वस्तू वा द्रव्य रूपाने दान करावे.

तनाचे दान : धर्माविषयीच्या उपक्रमांत सहभागी होणे, हे तनाचे दान होय. यासाठी देवतांचे विडंबन, धार्मिक उत्सवांतील अपप्रकार इत्यादी रोखावे.

मनाचे दान : कुलदेवतेचा जप करणे, तिला प्रार्थना करणे यांद्वारे मन अर्पण (दान) करावे.

मृत्तिका पूजनः 'सदोदित कृपादृष्टी ठेवणार्या मृत्तिकेमुळेच आपल्याला धान्यलक्ष्मी, धनलक्ष्मी आणि वैभवलक्ष्मी यांची प्राप्ती होते. अक्षय तृतीया हा दिवस म्हणजे कृतज्ञता भाव ठेवून मृत्तिकेची उपासना करण्याचा दिवस.

मातीत आळी घालणे आणि पेरणी

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर नांगरलेल्या शेतजमिनीचे अक्षय (अक्षय्य) तृतीया या दिवसापर्यंत मशागत करण्याचे काम पूर्ण करावे. (मशागत म्हणजे नांगरलेल्या शेतजमिनीची स्वच्छता करून खतमिश्रित मातीच्या थरांना खालीवर करणे.) अक्षय तृतीयेच्या दिवशी मशागत केलेल्या जमिनीतील मृत्तिकेचे कृतज्ञतेचा भाव ठेवून पूजन करावे. त्यानंतर पूजन केलेल्या मृत्तिकेमध्ये आळी घालावीत आणि त्या आळ्यांमध्ये बियाणे पेरावे. अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर बियाणे पेरण्यास प्रारंभ केल्यास त्या बियाण्यांपासून विपुल धान्य पिकते आणि बियाण्याचा कधीही तुटवडा होत नाही. त्यामुळे वैभव प्राप्त होते. (बियाणे म्हणजे मळणीतील धान्य आपल्या आवश्यकतेनुसार बाजूला काढून घेऊन उरलेले धान्य स्वतःला आणि इतरांना पुढच्या पेरणीसाठी राखून ठेवणे.)

वृक्षारोपण

अक्षय तृतीया या शुभमुहूर्तावर आळी करून लावलेल्या फळबागा भरघोस फळ उत्पादन देतात, तसेच आयुर्वेदात सांगितलेल्या औषधी वनस्पतीही अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर रोवल्यास या वनस्पतींचा क्षय होत नाही, म्हणजेच औषधी वनस्पतींचा तुटवडा भासत नाही.'

हळदीकुंकू

'स्त्रियांसाठी अक्षय तृतीया हा दिवस महत्त्वाचा असतो. चैत्रात बसवलेल्या चैत्रगौरीचे या दिवशी त्यांना विसर्जन करायचे असते. त्यानिमित्त त्या हळदीकुंकूही करतात.'

**संदर्भ : सनातन-निर्मित ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

# हरिभक्त परायण सोनवणे गुरुजी यांचा १० मे रोजी अमृत जीवनाचा अमृत महोत्सव साजरा होणार



**टेंभूर्णी । प्रतिनिधी** - १० मे ते १४ मे दरम्यान ह भ प सोनवणे गुरुजी यांच्या अमृत महोत्सवाच्या सोहळ्याची आज शिष्यमंडळींनी व्यापक स्वरूपात एक बैठक घेतली या बैठकीत काही निर्णय घेण्यात आले पाच दिवस चालणाऱ्या या सोहळ्यामध्ये श्री संत तुकोबारायांच्या जीवन चरित्रावर हरिभक्त परायण प्रभाकर महाराज होळकर आळंदी यांचे व्याख्यान होणार आहे तालुक्यातील कुंभार झरी येथील रहिवाशी असलेले गुरुवर्य ह भ प सोनवणे गुरुजी यांनी वारकरी संप्रदायाची समई सतत तेवत ठेवली असून वारकरी सेवेकरी मंडळींना संजीवनी देण्याचे सतत काम केले आहे त्यांनी बारा वर्षापासून वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून कित्येक उपक्रम राबवून सर्वसामान्यांना भक्तीची ओढ लावली तेअत्यंत शिस्तबद्ध शिक्षकी पेशा असलेले गुरुजींनी समाज प्रबोधन केले गेल्या बारा वर्षापासून तालुक्यातील सर्व वारकरी एकत्र घेऊन तालुक्यात फिरती संकष्टी चतुर्थी चालू केली याचबरोबर गेल्या बारा वर्षापासून तालुका व परिसरातील स्वग्राम ते श्रीक्षेत्र पंढरपूर पैठण आळंदी पाई वारी काढली श्रीक्षेत्र आळंदी येथे या भागातील वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून एक हक्काचे निवासस्थान बांधून आळंदी येथे अखंड हरिनाम सप्ताह केला या सर्व साऱ्या उपक्रमाची शिष्यमंडळींनी दखल घेऊन त्यांनी केलेल्या समाज ऋणातून उतराई होण्यासाठी त्यांच्या अमृत जीवनाचा अमृत महोत्सव ठेवला यासाठी महाराष्ट्रातून समाजा कडून गौरविलेले विद्वान कीर्तनकार हे पाच दिवस येथे कीर्तन सेवा देण्यासाठी पाचारण केले १० मे ते १४ मे दरम्यान होणारा हा सोहळा येथील समर्थ महाविद्यालय निमखेडा रोड येथे ठेवलेला आहे १४ मे रोजी सकाळी नगर प्रदक्षिणा झाल्यानंतर सत्कारमूर्ती हरिभक्त परायण सोनवणे गुरुजी यांचा सत्कार शर्करा तुला व गुरु पूजन होणार आहे हा होऊ घातलेला अमृत महोत्सवी सोहळा तालुक्यात प्रथमच होत असल्याने सर्व वारकरी संप्रदायात व भाविकात उत्सुकता निर्माण झाली आहे आजच्या झालेल्या या बैठकीत या सोहळ्याबाबत ऊहापोह होऊन पाच दिवस सर्वांना अन्नदानाचा प्रसाद वाटप होईल व कार्यक्रम जास्तीत जास्त चांगला कसा होईल यावर उपस्थितांनी चर्चा केली यासाठी हरिभक्त परायण सोनवणे गुरुजींची शिष्य मंडळी यामध्ये भगवान महाराज गायकवाड अंबादास महाराज भालके शिवाजी महाराज चव्हाण अनिल महाराज देवडे कौतिकराव महाराज चव्हाण अनिल महाराज म्हस्के विठ्ठल रांधवन दशरथ सोळंके भगवान महाराज चव्हाण वसंत महाराज चव्हाण निवृत्ती गुरुजी दिवटे साहेबरावजी खंबाट एडवोकेट शिरसाट यांची प्रामुख्याने उपस्थिती होती

## मुस्लिम पर्सनला बोर्डच्या हाकला बहुजन समाजाने साथ द्यावी - तय्यब देशमुख

**जालना । प्रतिनिधी -** मुस्लिम पर्सनला बोर्ड संपूर्ण देशात वक्फ बोर्ड संशोधन बीलच्या विरोधात काळी पट्टी बांधून निषेध व बत्तीगुल, धरणे आंदोलन करण्याचे आवाहन मुस्लिम पर्सनला बोर्ड संपूर्ण देशात करीत आहे, या आंदोलनाला बहुजन समाजाने साथ द्यावी असे आवाहन तय्यब बापु देशमुख यांनी केले आहे.



मुस्लिम पर्सनला बोर्डच्या आदेशाने मुस्लिम पर्सनला बोर्ड जालना महाराष्ट्र यांच्या वतीने काळी पट्टी बांधून निषेध व बत्तीगुल धरणे आंदोलन करण्यात येणार आहे, मुस्लिम पर्सनला बोर्ड जालना महाराष्ट्र यांच्या वतीने दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी रात्री ९ वाजता लाईट बंद करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. १५ मिनिटांसाठी म्हणजेच ९.१५ मिनीटांपर्यंत सर्वांनी लाईट बंद ठेवावी.

केंद्र सरकार वक्फ बोर्ड संशोधन बील वापस घेत नाही, तो पर्यंत मुस्लिम पर्सनला बोर्ड संपूर्ण देशात आंदोलन सुरुच ठेवणार आहे. बहुजन समाजाला विनंती आहे की, आपण मुस्लिम पर्सनला बोर्डला साथ द्यावी व केंद्र सरकार यांनी कोणत्याही धर्मामध्ये ढवळाढवळी करु नये, त्यांनी देशाच्या विकासाचा विचार करायला हवा. देशाचा युवा वर्गाला शासकीय नौकरी नाही. शिक्षणाचा स्तर घसरला आहे. केवळ मंदिर आणि मस्जिद करून लोकांची माथे फिरवू नका. त्या त्या धर्मातील ज्येष्ठ त्यांच्या पद्धतीने धर्माचे काम योग्य पद्धतीने पार पाडत आहे. देशात शांती होती. मात्र, २०१४ पासुन देशात व राज्यात फक्त हिंदू मुस्लिम शिवाय कोणताच मुद्दा नसल्याचेही श्री देशमुख म्हणाले आहे.

आता जनता जनार्दनाने जागृत झाले पाहिजे व जातिवाद व धर्मवादापासुन सावध राहाण्याची गरज आहे, मुस्लिम पर्सनला बोर्ड जालना महाराष्ट्र केलेल्या आवाहनाला सर्वांनी मिळून साथ देण्याची गरज निर्माण झाली असून येत्या ३० एप्रिल रोजी सर्वांनी १५ मिनीटी लाईट बंद ठेवून या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन तय्यब बापु देशमुख यांनी केले आहे.

### कायद्याच्या अभ्यासक विवाहितेचा पोलिसांच्या मदतीने न्याय

## आठ वर्षांपासून फरार पतीला फिल्मी स्टाईल अटक

**जालना । प्रतिनिधी -** गेली आठ वर्षे कायद्याच्या आधारे आपल्या न्यायासाठी संघर्ष करणाऱ्या विवाहितेला अखेर यश मिळाले आहे. जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या आणि मुंबई पोलिसांच्या संयुक्त कारवाईत, तब्बल आठ वर्षांपासून फरार असलेल्या पतीला मुंबईतून फिल्मी स्टाईलने अटक करण्यात आली.

संदीप अनिल खरात (४०,रा. प्रतिक्षानगर, सायन, मुंबई) याच्याविरुद्ध पत्नीने भरणपोषणासाठी जालना येथील कुटुंब न्यायालयात दावा दाखल केला होता. न्यायालयाने दरमहा २०,००० रुपये पोटगी देण्याचा आदेश दिला होता. मात्र आदेश झुगारून संदीप फरार झाला होता. गेल्या आठ वर्षांत जामीनपात्र व अजामीनपात्र अटक वॉरंट बजावले गेले तरीही अटक शक्य झाली नव्हती.

कायद्याच्या अभ्यासक असलेल्या पीडित विवाहितेने, पोलिस यंत्रणेशी सातत्याने संपर्क ठेवत, कायद्याचा वापर करून आपल्या हक्कासाठी संघर्ष सुरू ठेवला. अखेर अप्पर पोलिस अधीक्षक आयुष नोपाणी यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने मुंबई पोलिसांच्या मदतीने संदीप याला अटक केली.

विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांना कळले की संदीप मुंबईतील वर्तकनगर येथील बुधविहारात एका लग्न समारंभात सहभागी होणार आहे. लग्न समारंभात सापळा रचून पोलिसांनी संदीपला ताब्यात घेतले. अटक वेळी त्याने तो मी नव्हे असे म्हणत खोटी ओळख सांगण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी खाक्या दाखवताच त्याने खरी ओळख व गुन्हा कबूल केला.

पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली रामप्रसाद पव्हरे आणि कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी भाले यांनी मुंबई पोलिसांच्या मदतीने ही कारवाई केली. या फिल्मी स्टाईल अटकेमुळे जालना व मुंबईत पोलीस यंत्रणेचे कौतुक होत आहे.

गेल्या आठ वर्षांत आम्ही न्यायासाठी अनेक प्रयत्न केले. पोलिसांच्या मदतीने आणि कायद्याच्या जोरावर अखेर आम्हाला न्याय मिळाला. खाकीतील देव माणूस अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी सरांचे आम्ही विशेष आभार मानतो. उशीर झाला असला तरी न्याय मिळाल्याचे समाधान मिळाले असल्याची प्रतिक्रिया पिडीत विवाहितेने दिली.

दरम्यान, कायद्याच्या अभ्यासक असलेल्या पीडित पत्नीने भरणपोषणासाठी दावा दाखल केला होता. पत्नी व मुलीच्या संगोपनासाठी त्यांनी दरमहा २०,००० रुपये पोटगी देण्याचे आदेश असूनही, संदीप यांनी वेळोवेळी पोटगी रक्कम भरण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे पत्नीने न्यायालयात अर्ज दाखल करत कारवाईची मागणी केली होती. प्रस्तुत सादर झालेल्या पुराव्यांच्या आधारे, न्यायालयाने पतीच्या दुर्लक्षाची गंभीर दखल घेतली. आदेशानुसार, न्यायालयाने संदीप खरात याला सहा महिन्यांच्या साध्या कैदेची शिक्षा सुनावत, तसेच थकबाकी रक्कम तात्काळ भरण्याचे आदेश दिले आहेत.

फॅमिली कोर्ट जालन्यात पार पडलेल्या या निर्णयामुळे पोटगी प्रकरणांमध्ये न्यायालयाची कठोर भूमिका स्पष्ट झाली आहे.

## सुसंवादी सेवानिवृत्ती प्रा. शेषराव निघोटे

छत्रपती संभाजीनगर येथील विनायकराव पाटील महाविद्यालय येथे १९९५ रोजी प्राध्यापक म्हणून नेमणूक मिळवलेले, शेषराव निघोटे , हे एक सुसंवादी व्यक्तिमत्व, भेटल्यानंतर समोरची व्यक्ती आपलंसं करून घेण्यात ज्याचा हातखंडा आहे असे हे नेतृत्व. इतिहासाचे प्राध्यापक, नुसतेच प्राध्यापक नसून ते गाढे अभ्यासक सुद्धा आहेत. इतिहासाचा सखोल चिकित्सक अभ्यास करून विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात त्यांचा हतखंडा आहे. यांचीच नियुक्ती नंतर दहेगाव ता. वैजापूर येथील न्यू उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून झाली. आणि बघता बघता सर्व विद्यार्थ्यांना सर्व प्राध्यापकांना, तेथील शिक्षकांना तेथील मुख्याध्यापक प्राचार्यांना आपलंसं करून घेण्यामध्ये त्यांना वेळ लागला नाही. विद्यार्थी, त्यांचे पालक यांच्या सुसंवाद घडवून आणून, विद्यार्थी कॉलेजला कशी उपस्थित राहतील याकडे त्यांचा जास्त कल होता. गावातील व्यक्तींची त्यांचा सुसंवाद, आणि सुसंवाद साधण्याची कला, सुसंवाद साधत असतानाच सर्वप्रथम ते त्याच्या अडीअडचणी विचारत असत, अडीअडचणी विचारल्या म्हणजेच तो आपलासा कसा होईल याकडे त्यांचा कल असतो. विद्यार्थी असो व्यक्ती असो नागरिक असो पालक असो भेटल्यानंतर अगदी आनंदी कसा राहील हेच त्यांनी पाहिलं. विद्यार्थ्याला सखोल ज्ञान देण्याबरोबरच, विद्यार्थी वर्गात हसत खेळत कसे राहतील हेच पाहिले. विद्यार्थ्यांना शिकवताना तो विषय कसा समजेल याकडे त्यांचा कल असायचा. विद्यार्थी अभ्यासानंतर मूल्यमापनाच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांमध्ये उत्तरे सोडवण्याची कला कशी आत्मसात करेल याकडेही त्यांचा कल असायचा.



सुसंवादी नेतृत्वाचा आज सेवानिवृत्तीचा दिनांक आहे. ३० एप्रिल २०२५ हा नुसता साधा दिवस नसून, हिंदू संस्कृतीतील साडेतीन मुहूर्तांपैकी एक आहे. म्हणजेच आजचा दिवस अक्षय तृतीयेचा आहे. आजचा दिवस ५२ वर्षानंतर परत एकदा येईल. आणि कित्येक वर्षानंतर असा मुहूर्त ३० एप्रिल ला आलेला आहे. अक्षय तृतीयेच्या दिवशी सेवानिवृत्तीचा दिनांक येणे म्हणजे भाग्याचे समजल्या जानार असल्याचं शेषराव निघोटे समजतात. विशेष म्हणजे प्राध्यापक शेषराव निघोटे सरांना प्रथम नेमणूक दिनांक चे आदेश बुद्धीचा देवता गणपती याच्या संकष्टी चतुर्थीच्या दिवशीच आलेली आहे. शेषराव निघोटे सरांचा जन्म सहा एप्रिल १९६७ ला हडस पिंपळगाव येथे झाला. प्राथमिक शिक्षण हे त्यांच्या हडस पिंपळगाव येथेच झाले. १९७६ ते १९७९ पर्यंत त्यांचे शिक्षण हे हडस पिंपळगाव या गावीच झाले. मातृभाषेतील शिक्षण घेण्याचा आनंद ते नेहमी बोलून दाखवतात. मातृभाषेतील शिक्षण घेतल्यानेच आपण या स्तरा पर्यंत आलेलो आहे आणि सुसंवाद साधण्यांमध्ये मला कुठेही अडचण आलेली नाही, असेही ते बोलून दाखवतात. माध्यमिक शिक्षण पाचवी ते दहावी हे वैजापूर तालुक्यातील लासुर गावाला झाले. लहानपणापासूनच बोलण्याची सवय त्याचबरोबर आपलंसं करून घेण्याची सवय, वृद्धांशी बोलताना सो समवयासकांशी बोलताना असो तरुणांशी बोलताना असो शेषराव आपला आहे, हा भावच सर्वांच्या मनात निर्माण व्हायचा. हीच वृत्ती पुढेही कायम राहिली. १९९१ --९२ मध्ये त्यांनी मास्टर ऑफ आर्ट्स इतिहास विषयात पूर्ण केले. आणि तिथूनच त्यांनी प्राध्यापक होण्याचे स्वप्न उरी बाळगले. त्याचबरोबर शिक्षकी पेशा स्वीकारावा यासाठी त्यांनी शिक्षण शास्त्रातील बीएड ही पदवी ९३- ९४ मध्ये मिळवली. ही पदवी त्यांनी संत गाडगे बाबा महाराज अध्यापक महा विद्यालयामध्ये मध्ये मिळवली. संतांच्या नावाच्या अध्यापक महाविद्यालयात पदवी मिळाल्यामुळे संतांचा गुण सुद्धा त्यांच्याकडे आला. मधाळ बोलणे, व शब्दाची उकल कशी करता येईल हे सांगणे त्यांच्या मुखी बसले. न्यू उच्च माध्यमिक विद्यालयात नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी विविध पदे भूषविलेली आहेत. इतिहास मंडळाच्या विविध समित्यांमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे. विद्यार्थ्यांच्या निकालामध्ये गुणवत्ता निर्माण करण्याचं काम त्यांनी पूर्ण आपल्या कार्यकाळात केलेलं आहे. त्यांचे अनेक गुण आहेत. वेळेपूर्वी जाणे, विद्यार्थ्यात मिसळणे, विद्यार्थ्यांमध्ये सुसंवाद साधणे, अडीअडचणी समजावून घेणे, घरगुती अडचणही विद्यार्थ्यांची सोडवण्यामध्ये हातखंडा असलेल्या शेषराव निघोटे यांना खरी प्राध्यापिकी मुलांमध्ये रुजवली. निर्मळ मनाचा प्राध्यापक म्हणूनही त्यांची ओळख आहे. इतकच नाही तर शिक्षकी पेश्या मध्ये शासनाच्या विविध उपक्रमामध्ये सहभागी होण्याचा मानही त्यांना मिळाला. एवढेच नाही तर अत्यावश्यक सेवा म्हणून राबवण्यात येणाऱ्या राज्य मंडळाच्या विविध कामांमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. सेवानिवृत्तीच्या शेवटच्या महिन्याच्या २२ तारखेपर्यंत ते विभागीय मंडळाच्या कार्यात सक्रिय सहभाग नोंदवलेला त्यामुळे तेथील कर्मचाऱ्यांनी , इतिहास प्राध्यापकांनी मंडळाच्या अधिकाऱ्यांनी त्यांचा यथोचित सत्कार केला. नुसता सत्कार केला नाही तर मंडळाच्या सहसचिव पाटील मॅडम यांनी त्यांचा गौरव सुद्धा केला. आपल्या सेवेमध्ये सेवाभाव कसा राबवावा हे ज्यांनी इतरांना दाखवून दिले त्या वृत्तीचा त्यांनी गौरव केलेला आहे. परीक्षक, नियामक, पेपर सेटर तसेच मुख्य नियमांच्या सर्व भूमिका त्यांनी निभावल्या. बोर्डाच्या विविध समित्यांमध्ये सुद्धा त्यांचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे. अशा सेवाभावी वृत्तीचा सुसंवादी प्राध्यापक सेवानिवृत्त होत आहे. विविध संतांनी सांगितलेले आहे की आपल्या कार्यात आपण सतत कार्यमग्न राहिलं पाहिजे. त्या कार्यात येणाऱ्या अडचणीवर मात केली पाहिजे. ही मात करताना कोणाशीही दुजाभाव राहणार नाही ही वृत्ती आपण बाळगली पाहिजे, हा संतांच्या अंगी असलेला भावाचा भावार्थ त्यांनी आपल्या जीवनामध्ये राबवलेला आहे. म्हणूनच दहेगावच्या या उच्च माध्यमिक विद्यालयातून सेवानिवृत्त होताना एका सुसंवादी प्राध्यापक यांचा सेवानिवृत्ती होत असताना दिसत आहे. ते सेवानिवृत्त होत असताना आपण पुढील कार्यात, पुढील जीवनात हेही सांगायला विसरले नाही की मी पुढील कार्यात सुद्धा असाच राहील व यात प्रगती करून समाजासाठी माझे कार्य थांबू देणार नाही. निवृत्तीनंतर वेळ मिळतो परंतु मी वेळेचं बंधन न पाळता समाजासाठी विद्यार्थ्यांसाठी माझ्या सहकारी शिक्षकांसाठी प्राध्यापकांसाठी वेळ देण्याचं काम मी नेहमी करणार आहे. अशा या सुसंवादी सेवानिवृत्ती प्राध्यापकाला सलाम!

**प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, प्रांत उपाध्यक्ष वेध रायगडाचा प्रतिष्ठान महाराष्ट्र.**

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597